## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२१/१०/२०१८
## दि.२०/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २९१/१८,भादविक ३९४,५०४,३४ |
| **फिर्यादी** | गोविंद पटेल,वय-१९,रा.शिवाजीनगर,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०१८ रोजी १८/५५ वा. मेट्रो ऑफीस,कामगार पुतळया जवळ,शिवाजीनगर धान्य गोडाऊन शेजारी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मेट्रो ऑफीस,कामगार पुतळा,शिवाजीनगर,पुणे येथे सुरक्षारक्षक म्हणुन नोकरीस आहेत. यातील नमुद इसमांनी फिर्यादी हें काम करीत असलेल्या ठिकाणी येवुन, त्यांना धक्का-बुक्की,शिवीगाळ व हाताने मारहाण करून,लेबर रूम मध्ये ठेवलेली क्रॉम्प्टन कंपनीची इलेक्ट्रिक मोटार ३ हजार रू किची जबरी चोरी करून घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एम.चव्हाण ९४२११६८२५७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे २२८/१८,भादविक ३९२,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | श्रीधर कोरे वय-२४ वर्षे,धंदा-कार चालक,रा.हडपसर पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील एक अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/१०/२०१८ रोजी रात्रौ १२/४५ वा. मृत्युंजय मंदीरा समोर कर्वेरोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे उबेर कंपनीचे कारवर चालक आहेत. फिर्यादी हे उबेर कंपनीचे भाडे घेवुन कार मधुन जात असताना,नमुद ठिकाणी यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे पाठी मागुन येवुन त्यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करून,फिर्यादी यांचे शर्टाचे खिशातील मोबाईल ६ हजार रू किचा जबरदस्तीने हिसकावुन घेवुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.जी.शिनगारे ९५२७९५६१०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३५७/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५६,रा.खडकी,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/१०/२०१८ रोजी सकाळी ०८/४५ वा चे सुमा फिर्यादी राहते घरासमोर ३४ डंकन रोड स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेचे समोर खडकी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे पतीसह प्रभातफेरी मारून,त्यांचे राहते घरी पायी परत येत असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे गंठन ९७,५००/- रू किचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. सी.एम.कांबळे ८८८८८०७५७२ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६८१/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | विकास बधे,वय-२९ वर्षे,रा.कोंढवा-बुद्रुक,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१०/२०१८ रोजी सकाळी ०८/०० ते १६/०० वा.चे दरम्यान फ्लॅट नं.ए/३,शांती हाईट्स खडी मशीन चौक,बधे नगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,फिर्यादी यांचे आजीने ठेवलेले बेडरूम मधील कपाटातील रोख ५० हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण ३,५०,०००/- रू किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शिंदे ९९२२९५५४७० |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २२०/१८,भादविक ४२०,२०६ |
| **फिर्यादी** | शेख जहरोदीन,वय-४४ वर्षे,रा शाहुनगर,जि.बीड |
| **आरोपी** | एक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०१/२०१८ रोजी ते आजपावेतो अल्ल-बक्का आणि उमराह कंसल्टंट शॉप नं.९,ए रहेजा मिदास बेसमेंट,३२५ एम.जी.रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना बोलावुन त्यांचे मुलास सौदी अरेबीया मध्ये नोकरी लावतो असे म्हणुन त्यांचेकडुन १५,०००/- रक्कम रुपये घेवुन,फिर्यादी यांचे मुलास नोकरी न लावता त्याची सर्व शैक्षणीक कागदपत्राचे झेरॉक्स,मुळ पासपोर्ट इत्यादि सर्व कागदपत्रे देखील स्वतःकडे ठेवुन घेवुन त्याची फसवणुक केली. तसेच साक्षीदार १.मोहम्मद अनिस याचेकडुन १,४२०००/- रुपये २.मोहम्मद नजमउल हक याचेकडुन १,२०,०००/- रूपये ३.शाबाद कादरी याचेकडुन १,२०,०००/- रोख रूपये अशा रकमा घेवुन त्यांनादेखील नोकरी न लावता,पैसे परत न करता,त्यांची फसवणुक केली आहे. (तक्रारी अर्जावरून सदरचा गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.जी.गज्जेवार ८१४९५९१६४६ |

**६**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११८८/१८,भादविक ४०६,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | रजनिश कुमार,वय-४२ वर्षे,रा.कस्तुरबा पथ,जि.सहरसा,राज्य बिहार |
| **आरोपी** | एक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०५/२०१७ ते दिनांक १२/१०/१८ रोजी पर्यंत ऑनलाईन ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची अमेरिकेमध्ये स्वॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कंपनी असुन,त्यामध्ये यातील नमुद इसम हा ३८ टक्के शेअर होल्डर व डायरेक्टर आहे. तसेच २४ टक्के इतर गुंतवणुक दार शेअर होल्डर आहेत. सन २०१५ मध्ये फिर्यादी व सदर इसमाने भारता मध्ये व्हेरीफिशंट टेक्नॉलॉजी इंक नावाची कंपनी सुरु केली असताना,त्याने सदर व्हेरिफिशंट टेक्नॉलॉजी इंक कंपनीची वेबसाईट, लोगो, ई-मेल अकाऊंटस,कंपनीचे ऑफीस,फर्निचर, लॅपटॉप, कॉम्प्युटर, प्रिंटर, ऑफीसची जागा, भाडेकरारनामा व कंपनीचे कामगार यांचा वापर करुन,फिर्यादी व कंपनी मध्ये इतर गुंतवणुकदार यांचे संमतीशिवाय व्हेरीफिशंट टेक्नॉलॉजी प्रा.लिमी.नावाची कंपनी दि.०३/०५/२०१७ रोजी स्थापन करुन,सर्व व्यवसाय त्या कंपनी मध्ये हस्तांतरीत करुन सदर कंपनी मध्ये ऑनलाईन ३ कोटी ५ लाख रुपये (४,४६,०००/- डॉलर) चा विश्वासघात करुन ते ट्रान्सफर करुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. तांबे हडपसर पो स्टे पुणे मो नं ९८२३७०५४५५ |

**७**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे २२९/१८,भादविक ३५३,३३२,३४१,५०४ |
| **फिर्यादी** | भानुदास राठोड,वय-३३ वर्षे,धंदा-पीएमपीएमएम वाहक,रा.पापडे वस्ती,भेकराईनगर,फुरसुंगी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/१०/२०१८ रोजी १७/५० वा. एसएनडीटी कॉलेज बस स्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पीएमपीएमएल बसवर वाहक म्हणुन नोकरीस आहेत. त्यांची बस ही नमुद वेळी व ठिकाणी एसएनडीटी कॉलेज बस स्टॉप येथे आली असता,यातील नमुद इसमाने बस मध्ये प्रवासी म्हणुन बसुन,बसचे तिकीट काढण्याचे कारणावरुन,फिर्यादी व बस चालक खराडे यांना शिवीगाळ करुन त्यांच्या अंगावर धावुन जावुन,त्यांना बस पुढे जावु देणार नाही असे म्हणुन बसचे स्टेअरिंग धरुन ओढुन,त्यांना हाताने मारहाण केली. तसेच फिर्यादी यांना शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन,त्यांचे सरकारी कामावरील ड्रेस फाडुन,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण करुन त्यांचेवर हल्ला केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए.डी.घोडके ९२८४७९९११५ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६७७/१८,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | मुकेश राइका,वय-३८,रा.सांळुखे-विहार रोड कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०१८ रोजी सकाळी ०७/०० ते ०७/१५ वा.चे दरम्यान वंदना मेडीकेअर मेडीकलचे दुकान,नसीब पार्क शॉप नं.१,ए.बी.सी.फॉर्म जवळ सांळुखे-विहार रोड कोंढवा-खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाचा जितु हेमराज राइका हा वंदना मेडीकेअर मेडीकलचे दुकानात झोपला असताना,त्यांचे दुकानातील कामगार हा दुकानाचे शटर हे थोडेवर करुन बाथरुमकरीता गेला असताना,तेथे दबा धरुन बसलेला फिर्यादी यांचा दुसरा कामगार याने शटर अर्धे उघडे असल्याचा फायदा घेवुन,त्यावाटे दुकानात प्रवेश करुन,फिर्यादी यांचे दुकाना मधील लाकडी कपाटात ठेवलेली रोख १८,००,०००/- रुपये रोख रक्कम फिर्यादी यांचे संमतीशिवाय चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वाडकर ९९२३२४१५२१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**